# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

E.Mail- pilcbnskr@gmail.com


-----------------------------------------------------------------------

**प्रेसनोट** दिनांकः- २६/०९/२०१८

## अखिल भारतीय पोलीस रोईंग वॉटरस्पोर्ट स्पर्धेत नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे राष्ट्रीय खेळाडु समाधान गवळी व नाशिक शहर आयुक्तालयाचे योगेश लभडे यांना ''कांस्यपदक''

-----------------------------------------------------------------------

दिनांक २२ सप्टेंबर २०१८ रोजी पासुन पंजाब राज्यातील चंदिगड शहरात **१८ व्या अखिल भारतीय पोलीस रोईंग वॉटरस्पोर्ट** स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत महाराष्ट्र राज्य पोलीस दलातर्फे **नाशिक ग्रामीण** जिल्हयाचे रोईंगपट्टू **राष्ट्रीय खेळाडु श्री. समाधान गवळी** व **नाशिक शहर** पोलीस आयुक्तालयाचे **श्री. योगेश लभडे** यांनी सहभाग नोंदविला होता. सदर स्पर्धेत **''डबल स्कल''** या रोईंग क्रिडा प्रकारात पोलीस खेळाडु समाधान गवळी व योगेश लभडे यांनी उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्र पोलीस दलास **''कांस्यपदक''** मिळवुन यश संपादित केले आहे. राष्ट्रीय पातळीवर झालेल्या सदर रोईंग स्पर्धेत देशभरातील एकुण २२ संघांनी सहभाग नोंदविला होता.

नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे **श्री. समाधान गवळी** हे राष्ट्रीय पातळीवरील रोईंगपट्टू असुन त्यांनी गेले ०८ वर्षे महाराष्ट्र राज्य पोलीस दलातर्फे अखिल भारतीय पोलीस रोईंग स्पर्धेत यश संपादन करून सुवर्ण, रजत तसेच कांस्य पदक मिळविलेले आहे. त्यांनी सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करून नाशिक ग्रामीण पोलीस दलासह महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचे नावलौकिक केलेले असुन त्यांना सहा.पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नतीही यापुर्वी देण्यात आलेली आहे. सध्या ते **नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे क्रिडा प्रशिक्षक** म्हणुन कार्यरत असुन नवप्रविष्ठ पोलीस कर्मचा-यांना रोईंगसह विविध क्रिडा प्रकारांचे प्रशिक्षण देत आहे.

१८ व्या अखिल भारतीय पोलीस रोईंग वॉटरस्पोर्ट स्पर्धेत महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचे नावलौकिक करून कांस्यपदक पटकाविणारे पोलीस खेळाडू श्री. समाधान गवळी व योगेश लभडे यांचे **महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक श्री. दत्ता पडसलगीकर सो.** यांनी विशेष अभिनंदन केले आहे. तसेच नाशिक शहर पोलीस आयुक्त **डॉ.श्री. रविंद्रकुमार सिंगल सो**, विशेष पोलीस महानिरीक्षक **डॉ. श्री. छेरिंग दोरजे सो,** व पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण **श्री. संजय दराडे सो** यांनीही दोन्ही खेळांडुचे अभिनंदन करून भविष्यातही अशीच उत्कृष्ट कामगिरी करावी यासाठी शुभेच्छा दिल्या.

-----------------------------------------------------------------------